## प्रेसनोट ता.२४/०८/२०१८

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना तात्काळ मदत व सेवा मिळणेसाठी तसेच त्यांचे तक्रारींची तात्काळ दखल घेवुन त्यावर कार्यवाही करण्यासाठी व त्यांचे निराकरण करण्यासाठी नवीन व्हाटस्अप सुविधा नियंत्रण कक्षात उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या व्हाटस्अपचे क्रमांक ८९७५२८३१०० व ८९७५९५३१०० असे आहेत.

तरी नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ज्यांना पोलीसांची मदत पाहिजे आहे तसेच त्यांच्या तक्रारीची दखल घेवुन त्यावर कारवाई होणे आवश्यक आहे व त्यांच्या आजुबाजुला घडणा-या गंभीर घटनांची माहीती पोलीसांना घ्यावयची आहे, त्यांनी वरील नमुद व्हाटस्अप क्रमांकावर संपर्क साधावा.

तसेच पुणे शहरातील वाहतुकीच्या अनुशंगाने ज्या नागरिकांना तक्रारी द्यावयाच्या आहेत, काही सुचना करावयाच्या आहेत, त्यांच्यासाठी ही पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी स्वतंत्र व्हाटस्अपची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्याचा क्रमांक ८४११८००१०० असा आहे. नागरिकांना विनंती करण्यात येते की, ज्यांना वाहतुकीच्या अनुषंगाने काही तक्रारी अथवा सुचना करावयाच्या आहेत, त्यासाठी वरील व्हाटस्अप क्रमांकाशी कृपया संपर्क साधावा.